डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, अकोला - ४४४१०४

सूचना का अधिकार

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail –registrar@pdkv.ac.in

वाचा- १. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र काप/०४/२०१६ दि. ०८ जानेवारी, २०१६
२. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे कुलगुरु समन्वय समितीच्या म.कृ.वि.कु.स.स. (१७३)/१३/२०१७ दि. १९ मे, २०१७
३. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/का.१७, दि. ०१ मार्च, २०१८
४. विद्यापीठ आदेश क्र.आस्था/से.प्र.प/२०२०/३३६८ दिनांक १३.२.२०२०
५. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.काप/४१/२०२१ दि. २२ जुलै, २०२१

जा.क्र. आस्था/से.प्र.प./२०२१/ 2009 दिनांक- ३० नोव्हेंबर ,२०२१

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ कायदा सन १९६७ अन्वये महाराष्ट्र राज्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची स्थापना दि. २० ऑक्टोबर , १९६९ रोजी करण्यात आली आहे. दि. १२ ऑक्टोंबर, १९८१ रोजी झालेल्या कुलगुरु समन्वय समितीच्या निर्णयानुसार चारही कृषि विद्यापीठांने कार्यकारी परिषदेची मंजुरात घेवून विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षेकरीता कार्यवाही करण्याबाबत ठरविण्यात आले होते. परंतु त्यानंतर "कुलगुरू समन्वयन समितीने ठराव क्रमांक -म.कृ.वि.कु.स.स (१७३) /१३/२०१७ दिनांक १९ मे, २०१७ नुसार विद्यापीठ कर्मचा-यांच्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचे आयोजन यापुढे विद्यापीठांनी स्वतंत्रपणे आपआपल्या स्तरावर करावे जेणेकरून त्या त्या विद्यापीठातील कर्मचा-यांचे वेतनवाढ प्रकरणे त्वरीत निकाली काढणे सोईचे होईल " असा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त प्रमाणे सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विद्यापीठामध्ये लागु करण्याबाबत बाब विचाराधीन होती त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. ५ मध्ये नमुद मा. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्रमांकः-काप/४१/२०२१, दिनांक २२ जुलै, २०२१ नुसार विद्यापीठात सेवाप्रवेशोत्तर परिक्षा लागु करण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला असुन त्यानुसार -

१) विद्यापीठ सेवेत नामनिर्देशाने दिनांक ८ जानेवारी २०१६ नंतर (by Nomination) नियुक्त झालेले व ज्यांचे वय ५० वर्षाच्या आत आहे असे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहीत संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

२) मा. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र. ४१ दिनांकः - २२ जुलै, २०२१ नंतर पुढील पदोन्नती झालेले व ज्यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे त्यांना सदर परिक्षा विहीत संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, अकोला - ४४४१०४

सूचना का अधिकार

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail –registrar@pdkv.ac.in

## आदेश

जा.क्र. आस्था/से.प्र.प./२०२१/ दिनांक: - ३० नोव्हेंबर, २०२१

उगरोक्त वस्तुस्थितीनुसार असे आदेशीत करण्यात येते की, संदर्भ क्र.५ मध्ये नगुद विद्यापीट कार्यकारी परिषदेच्या निर्णयास अनुसरून या विद्यापीठामध्ये सेवाप्रवेशोत्तर परिक्षा लागु करण्यास व त्या अनुषंगाने पारित करण्यात आलेल्या विनियमास ज्यामध्ये १. पात्र परिक्षार्थी २. परिक्षेचे विषय/अभ्यासक्रम व पुस्तके (प्रश्न पत्रिका १,२,३) ३. प्ररिक्षेचे स्वरूप (गुण विभाजन ,परिक्षेचा निकाल) ४. परिक्षेचे नियोजन यांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्यात येते.

सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचे संपुर्ण नियोजन व आयोजन कुलसचिव कार्यालयामार्फत करण्यात येईल.

सदर आदेशाची अमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/-
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलीपी-
१.संचालक संशोधन/विस्तार शिक्षण,डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
२.अधिष्ठाता,कृषि/अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
३. सहयोगी अधिष्ठाता.................................................................... डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
४. विभाग प्रमुख,.................................................................... डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
५. विद्यापीठ अभियंता, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
६. नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
७. उपकुलसचिव(साप्रवि), डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
८. वेतन व लेखाधिकारी , डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
९. मा. कुलगुरू/मा. कुलसचिव यांचे स्विय सहायक, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला
१०.........................................................................................................

कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

Scanned with CamScanner

# सेवा प्रवेशोत्तर परिक्षा (Post Recruitment Exam)
## विनियम (Regulation)

**I पात्र परिक्षार्थी :**

१. ज्या कर्मचाऱ्याची नियुक्ती दि. ०८ जानेवारी २०१६ नंतर झाली व ज्यांचे वय ५० वर्षाच्या आत आहे, असे विद्यापीठ सेवेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल व पुनश्च: त्याच-प्रमाणे नव्याने रूजु होणारे कर्मचारी ज्यांचे वय ५० वर्षाच्या आंत आहे, असे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देखील सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होणे, आवश्यक राहील. (तसेच दि. ८ जानेवारी २०१६ पुर्वी रूजु झालेले ५० वर्ष वया खालील कर्मचाऱ्यांना सुध्दा या परिक्षेतुन वगळण्यात येईल परंतु पुढील पदोन्नती झाल्यावर हा ठराव परित झाल्यावर ज्यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे त्याला सदर परिक्षा वीहीत संधीत उत्तीर्ण होणे गरजेचे राहील.)

२. विद्यापीठ सेवेत असणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ज्यांचे वय ५० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक आहे आणि १५ वर्षे अखंड सेवा दिली असेल अशा कर्मचाऱ्यांना परिक्षेतुन सुट देऊन व तशी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल.

३. ज्या कर्मचाऱ्यांनी यापुर्वीच्या कार्यालयाचे आस्थापनेवर कार्यरत असतांना सदर परिक्षा उत्तीर्ण केली असेल व त्याची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेतलेली असेल तर, अशा कर्मचाऱ्यांना ही परीक्षा देणे बंधनकारक नाही. जे कर्मचारी ही परीक्षा उत्तीर्ण केली असेल तर ते प्रमाणपत्र सादर करतील व त्याची नोंद सेवा-पुस्तिकेत करण्यात यावी.(ज्या कर्मच्याऱ्यांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली असुन ज्यांचे सेवा पुस्तकित तशी नोंद घेतलि आहे असे कर्मचाऱ्यांना अश्यापरीक्षेतुन सुट देण्यात येईल. ज्यांनी परीक्षा उत्तीर्ण केले आहे परंतु सेवा पुस्तिकेत नोंद नाही अशा कर्मचाऱ्यांनी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांची सेवा-पुस्तिकेत नोंद घेण्यात येईल.)

४. सेवा प्रवोशोत्तर परीक्षा चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना देणे बंधनकारक नाही पण सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ही परीक्षा देणे बंधनकारक राहील. परंतु ज्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा श्रेणी तिन मध्ये पदोन्नतीचा लाभ घेतला आहे त्यांना सदर ठरावाच्या दिनांकापासुन पुढे सदर परीक्षा देणे व ऊत्तीर्ण होणे बंधणकारक राहील.

५. उपरोक्त टरावा-नुसार खालील नमुद पदावर दि. ०८ जानेवारी २०१६ नंतर नियुक्त अधिकारी / तथा पदोन्नत कर्मचाऱ्यांना सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | २ | सहयोगी प्राध्यापक | ३ | सहायक प्राध्यापक | ४ | विद्यापीठ ग्रंथपाल |
| ५ | उपअभियंता | ६ | सहायक कुलसचिव/ सहा. नियंत्रक | ७ | शाखाधिकारी | ८ | सहायक शाखाधिकारी |
| ९ | तांत्रिक सहायक | १० | सहा. वैद्यकीय अधिकारी | ११ | मुख्य कलाकार | १२ | वरिष्ठ संशोधन सहायक |
| १३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४ | कनिष्ठ संशोधन सहायक | १५ | पशुधन पर्यवेक्षक | १६ | कनिष्ठ अभियंता |
| १७ | वरिष्ठ लिपीक | १८ | शाखा सहायक | १९ | निर्गम सहायक | २० | ग्रंथालय सहायक |
| २१ | मुख्य तालीकाकार | २२ | प्रतिरूपलेखन सहायक | २३ | कॅशिअर | २४ | सिनीअर स्टोअर किपर |
| २५ | लघुलेखक | २६ | लघुटंकलेखन | २७ | अनुरेखक (Tracer) | २८ | आरेखक (Draftman) |
| २९ | सहायक ग्रंथपाल | ३० | विद्यार्थी कल्याण | ३१ | कनिष्ठ संगणक | ३२ | कलाकार |

Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | कनिष्ठ तालिकाकार | ३४ | अधिकारी<br>प्रक्षेत्र अधिकारी | ३५ | सहायक<br>सर्वेअर | ३६ | फोरमन सुपरवाईझर |

६. खालील संवर्गात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रस्तुत परिक्षा उत्तीर्ण होण्याचे बंधन नाही.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व कृषि सहायक/प्रयोगशाळा सहायक (All Agri. Asstt./Lab. Asstt.) | २ | वरिष्ठ यांत्रिक (Mechanic) | ३ | तांत्रिक तथा वीज तांत्रिक (Mechanic-cum Electrician) | ४ | प्रक्षेत्र यांत्रिक (Farm Mechanic) |
| ५ | जोडारी तथा यांत्रिक (Fitter-cum-Mechanic) | ६ | कातारी (Turner) | ७ | जोडारी (Fitter) | ८ | यंत्र कारागिर (Mechanist) |
| ९ | ओतारी (Foundryman) | १० | संधाता (Welder) | ११ | यांत्रिक तथा चालक (Mecha.-cum-Electrician) | १२ | वाहन चालक (Driver) |
| १३ | कनिष्ठ यांत्रिक (Jr. Mechanic) | १४ | सुतार (Carpenter) | १५ | लोहार (Blacksmith) | १६ | तारतंत्री (Wireman) |
| १७ | मिस्तरी (Maistary) | १८ | नळ कारागिर (Plumber) | १९ | विजतंत्री (Electrician) | २० | गवंडी (Mason) |
| २१ | पंप चालक (Pump Operator) | २२ | दृकश्राव्य चालक (Audio-Visual-Operator) | २३ | मिश्रक (Compounder) | २४ | अधिपरिचारीका (Nurse) |
| २५ | जुडणीकार (Compositer) | २६ | छपाईकार (Printer) | २७ | बाईंडर (Binder) | २८ | चलक छाया चित्रकार (Movie Cameraman) |
| २९ | अंधार खोली सहायक (Dark room Assistant) | ३० | लघुलेखक व लघुटंकलेखक (Stenographer & Steno typist) | ३१ | अनुरेखक (Tracer) | ३२ | आरेखक (Draftman) |
| ३३ | उपकरण (Instrument Mechanic) | ३४ | इतर तत्सम पदे (Equivalent Cadres) | | | | |

७. ज्या कर्मचाऱ्याच्या नियुक्त्या दि. ०८ जानेवारी २०१६ नंतर झाल्या आहेत त्यांनी सेवा प्रवेशोत्तर नियुक्तीच्या पाच वर्षामध्ये सेवा कालावधितपरिक्षा चार संधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतन वाढ रोखण्यात येईल.

८. नवनियुक्त कर्मचारी प्रवेशोत्तर परीक्षा देण्याकरीता रूजु झाल्यापासुन एक वर्षा नंतर परीक्षेकरिता पात्र असेल. परंतु पदोन्नत झालेले कर्मचारी लगेच होणाऱ्या परीक्षेकरीता पात्र असतील.

९. उक्त कर्मचाऱ्यास पहिली वेतन वाढ मिळेल परंतु नंतरची वेतन वाढ सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच देय होईल. (परिविक्षाधीन कालावधीबाबत नव्याने रूजु होणारे)

१०. प्रवेशोत्तर परिक्षा नेमुन दिलेल्या कालावधीत उत्तीर्ण न केल्यामुळे अशा कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्याचेकुठलीही पूर्वसुचना न देता, समाप्तीचे अधिकार विद्यापीठ प्रशासनाला राहतील किंवा प्रशासणाकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

## II परिक्षेचे विषय/अभासक्रम व पुस्तके :

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रथम व तद्नंतरदरवर्षी घेण्यात येणाऱ्या विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे असेल.

**प्रश्न पत्रिका क्र. १**

| प्रश्नपत्रिका क्रमांक - १ गुण - १०० | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विषय व भाग | गुण | अभ्यासक्रम | पुस्तके | परिक्षेची तारीख | परिक्षेची वेळ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ अ | अधिनियम व परिनियम भाग-१ **(पुस्तकासह)** | ५० | १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (कृषि विद्यापीठे) अधिनियम - १९८३ आणि त्या आधारे तयार केलेले परिनियम १९९० | १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (कृषि विद्यापीठे) अधिनियम - १९८३ (सुधारित)<br>२. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (कृषि विद्यापीठे) परिनियम - १९९०(सुधारणेसह) | ही परिक्षा सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये प्रत्येक वर्षी घेण्यात येईल | परिक्षेची तारीख ठरल्यानंतर वेळ निश्चित केल्या जाईल |
| १ ब | विद्याविषयक बाबी भाग-२ **(पुस्तकासह)** | ५० | १. विद्यापीठात चालविले जाणारे कृषि विषयाचे अभ्यासक्रम<br>२. गुणभार पध्दत, षंण्मासिक सत्रआणि विद्यार्थ्यांचे अभिलेख ठेवणे.<br>३. प्रवेश प्रक्रिया (सर्व अभ्यासक्रम व आरक्षण)<br>४. वसतिगृह प्रशासन<br>५. शिष्यवृत्ती आणि विद्यावेतन<br>६. विद्यार्थी कल्याण या संबंधी असणारे नियम, अधिनियम, आदेश. | १. विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले ठराव नियम आणि आदेश<br>२. शैक्षणीक नियमावली (पदवी व पदव्युत्तर)<br>३. प्रवेश माहिती पुस्तीका (महाराष्ट्र कृषि परिषद पुणे) - यांनी दरवर्षी प्रसारीत अद्यावत माहिती पुस्तिका<br>४. चौथ्या व पाचव्या अधिष्ठाता समितीने पदवी व पदव्युत्तर विद्याशाखांचे शिफारस केलेले अभ्यासक्रम. | ही परिक्षा सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये प्रत्येक वर्षी घेण्यात येईल | परिक्षेची तारीख ठरल्यानंतर वेळ निश्चित केल्या जाईल |

Scanned with CamScanner

Paper 1st

## COURSE TOPIC AND BOOKS FOR EXAMINATION

| Sr. No | Subject | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Section & Part | Marks | Topics | Books | Date of Examination | Time of Examination |
| 1 A | Section 1 Act and Statute **(with books)** | 50 | 1. The Maharashtra Agriculture University (Krishi Vidyapeeth) Act 1983 & statute made there under...<br>2. The Maharashtra Agriculture University (Krishi Vidyapeeth) Act 1983 with Amendments.<br>3. The Maharashtra Agriculture University (Krishi Vidyapeeth Statute 1990 (Revised) | University Act and Statute | Will be conducted in the month of September or October every year | Will be Communicated as date are fixed |
| 2 B | Section II Academic Matters **(with Books)** | 50 | 1. All matters pertaining to various courses offered by the University<br>2. The course credit system, semesters andmaintenance of student's records.<br>3. Procedure for admission to various courses, Reservations.<br>4. Administration of hostels<br>5. Scholarships and stipends.<br>6. Students welfare. Relevant Regulation, Rules & Orders issued by the University | 1. Decisions taken at University level though Academic and Executive council<br>2. UG & PG Rules and Regulation<br>3. Prospects of MCAER Published every year<br>4. Syllabus of education declared by 4th and 5th Deans committee<br>5. Rules and regulation formulated by University for Hostels | Will be conducted in the month of September or October every year | Will be Communicated as date are fixed |

Scanned with CamScanner

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

१ प्रथम वतद्नंतर दरवर्षी घेण्यात येणाऱ्या विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचा अभ्यासक्रम खालिलप्रमाणे राहील.

**प्रश्न पत्रिका क्र. २**

| प्रश्नपत्रिका क्रमांक - २ गुण - १०० | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विषय व भाग | गुण | अभ्यासक्रम | पुस्तके | परिक्षेची तारीख | परिक्षेची वेळ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २ अ | लेखा विषयक भाग-१ **(पुस्तकासह)** | ५० | १. वित्तीय नियमावली/नियम अणि लेखा संहिता<br>२. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी / डी.सी.पी.एस.<br>३. आकस्मित खर्च<br>४. अंदाजपत्रक<br>५. विद्यापीठातील अर्थविषयक बाबी/विद्यापीठ निधी हाताळणे | १. विद्यापीठ लेखा संहिता।<br>२. मुंबई वित्तीय नियम - १९५१<br>३. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम-१९६५<br>४. अंदाजपत्रक नियमावली (महाराष्ट्र शासन) | ही परिक्षा सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये प्रत्येक वर्षी घेण्यात येईल | परिक्षेची तारीख ठरल्यानंतर वेळ निश्चित केल्या जाईल |
| २ ब | सर्वसाधारण लेखा विषयक बाबी भाग-२ **(पुस्तकाशिवाय)** | ५० | १. जमा आणि खर्चाच्या ताळमेळासहित लेखा व्दिनोंदणी पध्दत.<br>२. कार्यालयीन व्यवस्थापनासाठी शासन/विद्यापीठाने निर्गमित केलेले नियम<br>३. इंग्रजी लेखन/मसुदा/सारांश लेखन इत्यादी | १. व्दिनोंद पध्दतीमधील प्रथम पायरी (जे. आर. बॉटलीबॉय)<br>२. लिपीकवर्गीय कर्मचारी यांचे प्रशिक्षण पुस्तक (लिपीकवर्गीय भाग-४) (महाराष्ट्र शासन)<br>३. महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभाग कार्यालयीन पध्दतीची पुस्तीका. | ही परिक्षा सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये प्रत्येक वर्षी घेण्यात येईल | परिक्षेची तारीख ठरल्यानंतर वेळ निश्चित केल्या जाईल |

Scanned with CamScanner

Paper 2nd

# COURSE TOPIC AND BOOKS FOR EXAMINATION

| Sr. No | Subject | | | | Date of Examination | Time of Examination |
|---|---|---|---|---|---|---|
| | Section & Part | Marks | Topics | Books | | |
| 2 A | Section 1 Accounts **(with books)** | 50 | 1. Financial Rules and Account Code<br>2. General/Contributory Provident Fund<br>3. Contingent Expenditure<br>4. Budget<br>5. Handling of the University Fund/Money | 1. The University Accounts Code.<br>2. Bombay Financial Rules (Government of Maharashtra)<br>3. Maharashtra Contingent Expenditure Rules 1965, (Government of Maharashtra)<br>4. Budget Manual (Government of Maharashtra) | Will be conducted in the month of September or October every year | Will be Communicated as dates are fixed |
| 2 B | Section II Accounts **(without Books)** | 50 | 1. Double Entry system of accounts including compilation of receipt and payment, Accounts and Balance Sheets<br>2. Office& Management Procedure Prescribed by Government/University (admission to various courses, Reservations).<br>3. English Composition drafting and precise writing | 1. First steps in Double Entry book keeping (by J.R. Botliboi)<br>2. Hand books of training of Ministerial staff (Clerical Part-IV) (Government of Maharashtra)<br>3. Manual of office procedure of (Government of Maharashtra)/ Agriculture Department/University | Will be conducted in the month of September or October every year | Will be Communicated as dates are fixed |

Scanned with CamScanner

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

१ प्रथम वतद्नंतर दरवर्षी घेण्यात येणाऱ्या विद्यापीठ सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचा अभ्यासक्रम खालिलप्रमाणे राहील.

**प्रश्न पत्रिका क्र.३**

| प्रश्नपत्रिका क्रमांक - ३ गुण - १०० | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विषय व भाग | गुण | अभ्यासक्रम | पुस्तके | परिक्षेची तारीख | परिक्षेची वेळ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ३ अ | सेवा विषयक नियम भाग-१ **(पुस्तकासह)** | ५० | १. सेवाविषयक नियम | १. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सर्व) शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले शासन निर्णय<br>२. विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम आणि आदेश | ही परिक्षा सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये प्रत्येक वर्षी घेण्यात येईल | परिक्षेची तारीख ठरल्यानंतर वेळ निश्चित केल्या जाईल |
| ३ ब | शिस्त व वर्तणुक नियम भाग-२ **(पुस्तकासह)** | ५० | १. विद्यापीठ कर्मचारी यांचे भर्तीचे नियम, कंत्राटी नेमणुक किंवा प्रतिनियुक्ती व सेवाजेष्ठता इत्यादी बाबतचे नियम<br>२. विद्यापीठ/अधिकारी/कर्मचारी यांचे शिस्त व वर्तणुकबाबतचे नियम व विभागीय चौकशी | १. विद्यापीठाने वेळोवेळी तयार केलेले नियम.<br>२. विद्यापीठ प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले नियम व आदेश.<br>३. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९<br>४. महाराष्ट्र नागरीसेवा शिक्षण मधील नियम १९७९<br>५. विभागीय चौकशी पुस्तिका १९९१ | ही परिक्षा सप्टेंबर किंवा ऑक्टोंबर मध्ये प्रत्येक वर्षी घेण्यात येईल | परिक्षेची तारीख ठरल्यानंतर वेळ निश्चित केल्या जाईल |

Scanned with CamScanner

Paper 3rd

## COURSE TOPIC AND BOOKS FOR EXAMINATION

| Sr. No | Subject | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Section & Part | Marks | Topics | Books | Date of Examination | Time of Examination |
| **3 A** | Section 1 Service Book**(with books)** | 50 | 1. Service Rules | 1. Maharashtra civil service rules.<br>2. Rules and Regulation made and orders issued by the University from time to time | Will be conducted in the month of September or October every year | Will be Communicated as dates are fixed |
| **3 B** | Section II Accounts General **(with Books)** | 50 | Discipline and Conduct Rules<br>1. Rules regulating recruitment, appointment of contract, on deputation, seniority etc. regarding the university employees<br>2. Rules regulating Discipline and Conduct of university employee's departmental enquiries.<br>3. Rules and Regulations made from time to time by the university in this behalf | 1. Relevant resolutions and orders issued by the University.<br>2. Maharashtra civil service Rules (Discipline and Appeals) Rules 1979.<br>3. Maharashtra civil services (Conduct) Rules, 1979.<br>4. Maharashtra civil services discipline & appeal rules 1979<br>5. Maharashtra civil services Departmental enquiry rules 1991 | Will be conducted in the month of September or October every year | Will be Communicated as dates are fixed |

Scanned with CamScanner

## III परिक्षेचे स्वरूप

### गुण विभाजन

- सदर परीक्षा ही वर्षातुन एकदा सप्टेंबर किंवा ऑक्टोबर मध्ये घेण्यात येईल. परीक्षा घेण्याच्या दोन महीन्याआधी विद्यापीठ संकेत स्थळावर परीक्षेच्या तारखेची घोषणाकरण्यात येईल.
- संपुर्ण परीक्षा ३०० गुणांची राहील. या परीक्षेचे एकुण तीन विषय राहतील.
- सदर परिक्षेचेतक्ता विषय १, २ व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असेल.
- प्रत्येक विषयाला एकुण १०० गुण राहतील
- प्रत्येक विषयाचे दोन भाग राहतील,(भाग १ व भाग २).
- प्रत्येक भागाला ५० गुण राहतील.
- प्रत्येक भागाच्या ५० गुणांचे विभाजन दोन गटात राहील.
- पहील्या गटात ४० गुण राहतील व ८ प्रश्न विचारल्या जातील त्यातील कोणतेही ५ प्रश्न परिक्षार्थीला वर्णनात्मक स्वरूपात सोडवावे लागतील. प्रत्येक प्रश्नाला ८ गुण राहतील.
- दुसऱ्या गटामध्ये दहा वस्तुनिष्ठ (Objective Types) प्रश्न विचारल्या जातील.
- त्यांना एकुण दहा गुण राहतील प्रत्येक प्रश्नाला १ गुण देण्यात येईल.
- परीक्षार्थीला परीक्षा मराठी / इंग्रजी (Marathi / English) या पैकी कोणत्याही एका भाषेत देता येईल.
- परीक्षा ही दोन तासाच्या कालावधीची राहील.
- परीक्षेसाठी परीक्षार्थीला स्व:खर्चानी परीक्षेसाठी हजर व्हावे लागेल त्यासाठी परिक्षार्थीला कोणत्याच प्रकारचा भत्ता मिळणार नाही.
- परीक्षेला बसण्याकरीता परीक्षार्थीला कोणत्याच प्रकारी सुट्टी घेण्याची आवश्यकता नसेल. त्याला फक्त लेखी स्वरूपात कार्यरत असणाऱ्या कार्यलयातील अधिकाऱ्याची तशी लेखी अनुमती घ्यावी लागेल. संबंधीत अधिकाऱ्याला त्याला या परीक्षेपासुन अडवणुक करता येणार नाही.
- परीक्षेसाठी कोणत्याच प्रकारचा लेखक परीक्षार्थीला ठेवता येणार नाही.
- अंध, अपंग व कमी दृष्टी असणाऱ्यांना नियमाप्रमाणे सवलत देण्यात येईल.
- जर विद्यार्थी काही कारणानी परीक्षेस गैर हजर राहीला तर त्याला कोणत्याच प्रकारची सुट देण्यात येणार नाही.
- परीक्षार्थीना परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर एक तास अगोदर हजर राहावे लागेल.

### परीक्षेचा निकाल

- प्रत्येक भागा मध्ये एकुण ५० गुणा-पैकी उत्तीर्ण होण्याकरिता १८ गुण (३६%) आवश्यक राहतील.
- ३५ (७०%) गुण प्राप्त झाल्यास संबधित कर्मचाऱ्यास प्राविण्यासहित उत्तीर्ण घोषित करण्यात येईल.
- या भागाची परिक्षार्थीला परत परीक्षा देण्याची आवश्यकता राहणार नाही.
- या भागातील विषयाला सुट (exempt) देण्यात येईल.

Scanned with CamScanner